# समर्थांचे हस्तलिखित सीडी रुपात मिळणार

**म. टा. वृत्तसेवा,** नाशिकरोड

शुभवार्ता

समर्थ रामदास स्वामींनी नाशिक येथील टाकळीतील वास्तव्यात स्वहस्ते लिहिलेल्या वाङ्मयाचे डिजिटलायझेशन पूर्ण झाले असून, त्याच्या सीडी भक्तांसाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

सीडींचा संच टाकळी देवस्थानचे अध्यक्ष तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे, विश्वस्त ज्योती खैरनार, सुधीर शिरवाडकर, प्रकाश पवार यांच्या उपस्थितीत मठाकडे सुपूर्त करण्यात आला. समर्थ भक्तांना हे साहित्य टाकळी मठात मोफत उपलब्ध केले जाणार असल्याचे न्या. ब्रह्मे यांनी सांगितले. त्यासाठी आवश्यक संगणक, लॅपटाप, स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था करण्यात येणार आहे. साडेतीन हजार पानांची हार्ड कॉपी काढून भक्तांना अभ्यास व विक्रीसाठी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

समर्थांनी १६२० ते १६३३ मध्ये टाकळी येथील वास्तव्यात लिहिलेल्या साडेतीन हजार पृष्ठांमधील ओवी, अभंग, पदे धुळ्याचे समर्थ भक्त नानासाहेब देव यांनी तेथील समर्थ वागदेवता मंदिरात जतन करून ठेवले. समर्थांच्या महाराष्ट्रातील विविध मठांमध्ये जे वाङ्मय होते. ते १९५० मध्ये भ्रमंती करून नानासाहेब देवांनी धुळे येथे जतन करून ठेवले. ४३ वर्षांच्या न्यायालयीन लढाईनंतर टाकळी येथे २० डिसेंबर २०१२ रोजी कोर्टाच्या आदेशाने आणि न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली पहिले पंचवार्षिक विश्वस्त मंडळ स्थापन झाले. त्या अनुषंगाने धुळ्यातील समर्थ वागदेवता मंदिराचे विद्यमान अध्यक्ष शरद कुबेर व कार्याध्यक्ष डोंगरे यांनी टाकळीबाबतचे एक ते ५० बाडांमधील सर्व लेखन साहित्य १७ सीडींमध्ये डिजिटलायझेशन केले आहे. या सीडी आता भक्तांना उपलब्ध झाल्या आहेत.